महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**
दिंडोरीरोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004
EPABX: 0253- 2539100/300, Fax: 0253 - 2531836, Ph.: 2539219
**Email**: coe@muhs.ac.in, ugexamhom@muhs.ac.in **Website**: www.muhs.ac.in
MUHS

डॉ. अजित गजानन पाठक
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),
परीक्षा नियंत्रक

**Dr. Ajit Gajanan Pathak**
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
**Controller of Examinations**

जा. क्र. मआविवि/एक्स -४/७९८२/२०१८ दिनांक : ०७/०९/२०१८

## अधिसुचना क्र.११४/२०१८

विषय : केंद्रिय होमिओपॅथी परिषदेच्या निकषानुसार त्या-त्या वर्षाचे बि.एच.एम.एस. अभ्यासक्रम उत्तीर्ण होण्याकरीता कमाल मर्यादा लागू करणेबाबत...

संदर्भ : १) Homoeopathy (Degree Course) Regulation, 1983 (Amended upto March, 2016)
२) दि. ०७/०८/२०१८ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ७६/२०१८
३) विद्यापीठ अधिसुचना क्र. १६/२०१७ दि. ०१/०४/२०१७

केंद्रिय होमिओपॅथी परिषदेच्या Homoeopathy (Degree Course) Amendment Regulations, 2015 नुसार विद्यापीठाने दि. ०१/०४/२०१७ रोजीच्या अधिसुचना क्र. १६/२०१७ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासुन प्रथम वर्ष बि.एच.एम.एस. पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना बि.एच.एम.एस. अभ्यासक्रम (आंतरवासियता कालावधीसह) ११ वर्षाच्या कालावधीत पुर्ण करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच केंद्रिय होमिओपॅथी परिषदेच्या दि. २८/०३/२०१६ च्या Homoeopathy (Degree Course) Regulation 1983 (Amended upto March, 2016) मध्ये बदल करण्यात आला असून बि.एच.एम.एस. अभ्यासक्रमाच्या त्या-त्या वर्षात उत्तीर्ण होण्यासाठी कमाल मर्यादा विहित करण्यात आली आहे. त्यानुसार सदर विषय दि. ०७/०८/२०१८ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केला असता, खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"*केंद्रिय होमिओपॅथीच्या Homoeopathy (Degree Course) Amendment Regulations, 2015 नुसार बि.एच.एम.एस. अभ्यासक्रमामध्ये शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासुन प्रवेशित विद्यार्थ्यांना त्या-त्या वर्षातील अभ्यासक्रमाची परीक्षा सर्व विषयात उत्तीर्ण होण्यासाठी यापुढे केवळ चार संधी देण्यात याव्यात. तसेच, एखादा विद्यार्थी चार संधीचा लाभ घेवून देखील सर्व विषयात उत्तीर्ण न झाल्यास, अशा विद्यार्थ्यांचे संबंधीत महाविद्यालयाने वर्षभर पुनःश्च अध्यापन करुन घ्यावे व त्यानंतर अध्ययन पुर्ण केल्याची खात्री केल्यानंतर, त्या विद्यार्थ्यास विद्यापीठ परीक्षेस बसु देण्यात यावे. तसेच, चतुर्थ वर्षातील विद्यार्थी चौथ्या संधीत केवळ एक विषय अनुत्तीर्ण असल्यास त्यास संबंधीत विषयात उत्तीर्ण होण्यासाठी एक विशेष संधी देण्यात येवून पुढील परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात यावी. त्यानंतर संबंधित*

for N.B. all W.A. Groups
Director/Principal
S.K.H.Medical College,
Beed.

*विद्यार्थ्यांचे प्रवेश महाविद्यालयाने रद्द करावे व परीक्षेचा अर्ज विद्यापीठात सादर करु नये. शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ पासुन सर्व बि.एच.एम.एस. २०१५ अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांस बि.एच.एम.एस. अभ्यासक्रमाची सर्व वर्ष (प्रथम, द्वितीय, तृतिय व चतुर्थ) हि १० वर्ष कालावधीत उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे व पुढील १ वर्षात त्यांनी आंतरवासियता प्रशिक्षण पूर्ण करावे. सदर बाब सर्व संलग्नीत महाविद्यालयांना निदर्शनास आणुन द्यावी व प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन देण्याबाबत निर्देशित करण्यात यावे."*

उक्त ठरावानुसार शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना त्या-त्या वर्षासाठी विहित केलेली कमाल मर्यादा लागु राहिल. त्या अनुषंगाने महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करणेबाबतची कालगणना महाविद्यालयस्तरावर करण्यात यावी व त्याची खातरजमा केल्यानंतरच विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र विद्यापीठास सादर करावेत. तसेच, सर्व संबंधित महाविद्यालयाने कालमर्यादेची (Attempt) अट त्यांच्या प्रवेश माहिती पुस्तिकेत समाविष्ट करावी व विद्यार्थ्याने हमीपत्र (Undertaking) दिल्यानंतरच प्रवेश द्यावा. विद्यार्थ्यांचे हमीपत्र (Undertaking) संबंधीत विद्यार्थ्यांच्या नस्तीमध्ये महाविद्यालयाने जतन करुन ठेवावे.

सही/-
परीक्षा नियंत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/अधिष्ठाता,
सर्व संलग्नीत होमिओपॅथीक महाविद्यालये

for notice board
all W.A. groups
1.1.2020

**Director/Principal**
S.K.H.Medical College,
Beed.